पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र.८५१९/२००६ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे /नियमित करणे /स्थलांतरीत करणे यासंबंधी नव्याने सर्वंकष व सुस्पष्ट धोरण ठरविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग,

शासन निर्णय क्रमांक सीटीएम-०९०९/प्र.क्र.५५८/(भाग-२)/विशा-१ब

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ५ मे, २०११.

वाचा :- शासन निर्णय क्र. सीटीएम-०९०९/प्र.क्र.५५८/(भाग-२)/विशा-१ब, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक-४ ऑक्टोबर,२०१० व १४ मार्च २०११

**प्रस्तावना :-** मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्रमांक ८५१९/२००६ मध्ये अनधिकृत धार्मिक स्थळांची झालेली बांधकामे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करणे यासंबंधी दिनांक २९.९.२००९ व त्यानंतर दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने राज्य शासनाने धोरण निश्चित करुन अवैध धार्मिक स्थळांबाबतीत प्रत्येक अवैध धार्मिक स्थळनिहाय आढावा घेऊन अशी अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करणेबाबत कालबध्द कृती कार्यक्रम तयार करावा असे आदेश दिले आहेत.

त्यानुषंगाने राज्य शासनाने यापूर्वी संदर्भीय शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केले होते. सदर आदेश अधिक्रमीत करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने वर उल्लेखित प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे सविस्तर निर्देश प्रसृत करीत आहे.

**शासन निर्णयः-** सार्वजनिक / शासकीय जागेवरील अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करणे, याबाबत क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय/महानगरपालिकास्तरीय समित्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**i) राज्यस्तरीय समितीः-**

| | | |
|---|---|---|
| १) मुख्य सचिव | : | अध्यक्ष |
| २) अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) | : | सदस्य |
| ३) अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) | : | सदस्य |
| ४) प्रधान सचिव/सचिव (नगर विकास) | : | सदस्य |
| ५) प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास) | : | सदस्य |
| ६) प्रधान सचिव (विधी व न्याय) | : | सदस्य |
| ७) पोलिस महासंचालक | : | सदस्य |
| ८) प्रधान सचिव (गृह) (विशेष शाखा) | : | सदस्य सचिव. |



31 MAY 2011

**ii) जिल्हास्तरीय समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| २) पोलिस अधिक्षक | : | सदस्य |
| ३) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | : | सदस्य |
| ४) जिल्हयातील महानगरपालिकांचे आयुक्त | : | सदस्य |
| ५) जिल्हयातील नगरपरिषदांचे मुख्याधिकारी. | : | सदस्य |
| ६) कँटोमेंट बोर्ड /एम.आय.डी.सी./ सिडको/म्हाडा /एस.टी.महामंडळ/ रेल्वे/अन्य स्थानिक किंवा विशेष नियोजन प्राधिकरण इत्यादीचे संबंधित अधिकारी | : | सदस्य |
| ७) निवासी उपजिल्हाधिकारी | : | सदस्य सचिव |

**iii) महानगरपालिका स्तरीय समिती:-**

**(मुंबई , पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक, अमरावती, औरंगाबाद या शहरांकरीता)**

| | | |
|---|---|---|
| १) आयुक्त, महानगरपालिका | : | अध्यक्ष |
| २) पोलिस आयुक्त | : | सदस्य |
| ३) जिल्हाधिकारी | : | सदस्य |
| ४) एम.आय.डी.सी./एम.एम.आर.डी.ए. एन.आय.टी./सिडको/म्हाडा/ कँटोमेंट बोर्डस्/ अन्य स्थानिक विशेष नियोजन प्राधिकरण/रेल्वे/ इ.चे संबंधित अधिकारी | | सदस्य |
| ५) महानगरपालिका आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला उपायुक्त | : | सदस्य सचिव |

०२. सर्व अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करणे याबाबत जिल्हास्तरीय समिती व महानगरपालिका स्तरीय समिती यांनी पुढे परिच्छेद ०३ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीस अनुसरुन कार्यवाही करणे आवश्यक राहील.

०३. (i) शहरातील / जिल्हयातील सर्व अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी पुढील तीन महिन्यात अद्यावत करण्यात यावी.

(ii) विषयांकित प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. २९.९.२००९ रोजी दिलेल्या निर्देशानंतर अस्तित्वात आलेली अनधिकृत धार्मिक स्थळे, जिल्हास्तरीय समिती / महानगरपालिकास्तरीय समितीच्या स्तरावरच अविलंब निष्कासित करण्यात यावीत.

(iii) जी अनधिकृत धार्मिक स्थळे ही दिनांक २९.९.२००९ पूर्वी अस्तित्वात होती, त्यांच्याबाबतीत कायदा व सुव्यवस्था, वाहतूक, लोकमान्यता इत्यादी विषयी पोलीसांचा अहवाल, विकास नियंत्रण नियमावली आणि विकास आराखडा इत्यादीच्या दृष्टीने संबंधित नियोजन प्राधिकरणाचे अभिप्राय तसेच संबंधित भूधारकाची संमती प्राप्त करुन घेवून त्याआधारे सर्व अनधिकृत धार्मिक स्थळांच्या संदर्भात निष्कासन/नियमितीकरण करणाबाबतचा प्रारुप कृती आराखडा पुढील प्रमाणे ६ महिन्यात तयार करण्यात यावा :-

(अ) जे अनधिकृत प्रार्थनास्थळ जुने असून त्यांना व्यापक लोकमान्यता आहे व ज्यांच्या विषयी पोलीस अहवाल व नियोजन प्राधिकरणाचे अभिप्राय नियमितीकरणास अनुकूल आहेत आणि संबंधित भूधारकाची संमती आहे. त्यांचे "अ- वर्गात " वर्गीकरण करुन त्यांचा समावेश नियमितीकरणाकरीता प्रस्तावित अनधिकृत धार्मिक स्थळांच्या यादीत करण्यात यावा.

(ब) ज्या अनधिकृत धार्मिक स्थळांचे कायदा व सुव्यवस्थेच्या कारणामुळे किंवा ते वाहतूकीस अडथळा ठरत असल्यामुळे किंवा विकास आराखडा / विकास नियंत्रण नियमावलीच्या दृष्टीने किंवा इतर काही विशिष्ठ कारणांमुळे त्यांचे नियमितीकरण शक्य नाही, अशा अनधिकृत धार्मिक स्थळांचे वर्गीकरण "ब" वर्गात करुन त्यांचा समावेश निष्कासनासाठी प्रस्तावित अनधिकृत धार्मिक स्थळांच्या यादीत करण्यात यावा.

(iv) अनधिकृत धार्मिक स्थळांची वरील प्रमाणे तयार करण्यात आलेली वर्गीकृत यादी व त्यानुसार तयार करण्यात आलेला अनधिकृत धार्मिक स्थळांच्या नियमितीकरण / निष्कासनाचा प्रारुप कृती आराखडा जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीकडून स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावा. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर कृती आराखड्यातील धार्मिक स्थळे त्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे नियमितीकरण / निष्कासनासाठी विचाराधीन असून याबाबतीत कोणाला काही आक्षेप किंवा हरकत असल्यास ते त्यांनी एक महिन्याच्या कालावधीत जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीकडे दाखल करावेत असे सदर अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

(v) जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीकडून अधिसूचित करण्यात आलेल्या प्रारुप कृति आराखड्यातील कोणत्याही अनधिकृत धार्मिक स्थळाच्या निष्कासन/ नियमितीकरणा विषयी कोणत्याही व्यक्तीने / संस्थेने हरकती सूचना दाखल केल्यास असे हरकतीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीने, आवश्यकतेनुसार किंवा संबंधीताने तशी मागणी केली असल्यास एका विवक्षित दिनांकास याबाबत सुनावणी घ्यावी.

एखाद्या अनधिकृत धार्मिक स्थळाबाबत धार्मिक स्थळाची लोकमान्यता आणि स्थानिक रुढींमुळे असे अनधिकृत धार्मिक स्थळ आहे तेथेच नियमित करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकांच्या एखाद्या गटाने किंवा संस्थेने केल्यास त्याबाबत त्यांना उपरोक्त मुद्यांबाबत पुरावा देण्यासाठी सुचित करावे व गरजेनुसार संबंधिताना सुनावणी देण्यात यावी.

कोणत्याही अनधिकृत धार्मिक स्थळाचे अन्यत्र स्थलांतर एखाद्या संस्थेने किंवा गटाने प्रस्तावित करुन परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास स्थलांतरासाठी अशा संस्थेने / गटाने प्रस्तावित जागेच्या योग्यतेबाबत सखोल तपासणी करुन घ्यावी. अशी तपासणी करताना संबंधित भूधारकाची संमती असून प्रस्तावित जागा वाहतूकीस अडथळा ठरणार नाही, त्याचप्रमाणे सदर स्थलांतरामुळे विकास आराखडा / विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन होणार नाही, तसेच संबंधित अनधिकृत धार्मिक स्थळ स्थलांतर केल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची पूर्ण खात्री करुन सदर अनधिकृत धार्मिक स्थळास "क वर्गीकरण" देवून त्याचा समावेश स्थलांतरित करावयाच्या अनधिकृत धार्मिक स्थळांच्या यादीत करण्यात यावा.

(vi) त्यानंतर जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीने प्रत्येक अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन त्यांचे अ / ब / क वर्गीकरण अंतिम करुन त्यासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) प्रत्येक अ-वर्ग अनधिकृत धार्मिक स्थळाचे सध्याच्या जागेवरच योग्य त्या अटीशर्तीवर नियमीतीकरण करण्या विषयी निर्णय जिल्हास्तरीय / महानगरपालिकास्तरीय समितीच्या स्तरावरच घेण्यात यावा आणि राज्यस्तरीय समितीकडे यासंदर्भातील एकत्रित अहवाल पाठविण्यात यावा.

(ब) ब-वर्ग अनधिकृत धार्मिक स्थळांपैकी जे धार्मिक स्थळ दि. १ मे १९६० च्या पूर्वीपासून अस्तित्वात असतील त्यांना निष्कासित करण्यापूर्वी राज्यस्तरीय समितीची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील. अर्थात दि. १ मे, १९६० नंतरच्या ब-वर्ग अनधिकृत धार्मिकस्थळांची निष्कासनाची कार्यवाही जिल्हास्तरीय समिती / महानगरपालिका स्तरीय समितीने त्यांच्या स्तरावर करावी आणि दि. १ मे १९६० पूर्वीच्या ब-वर्ग अनधिकृत धार्मिक स्थळांच्या निष्कासना विषयी राज्यस्तरीय समितीची पूर्व मान्यता प्राप्त करुन निष्कासनाची कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही अनधिकृत धार्मिक स्थळांच्या निष्कासनाची कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीत अनधिकृत धार्मिक स्थळ निष्कासित करण्यासाठी नियोजित दिनांका विषयी १५ दिवसाची सूचना संबंधीत अनधिकृत धार्मिक स्थळावर चिटकवून प्रसिध्द करण्यात यावी व त्यानंतरच प्रत्यक्ष निष्कासनाची कार्यवाही करण्यात यावी.

(क) क-वर्गातील समाविष्ट करण्यात आलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळाच्या बाबतीत त्यांचे स्थलांतर प्रस्तावित करणाऱ्या गट / संस्थांकडून प्राप्त प्रस्तावाची जिल्हास्तरीय / महानगरपालिकास्तरीय समितीने बारकाईने तपासणी करुन प्रस्तावित स्थलांतरामुळे वाहतूकीस / पादचारी वाहतूकीस अडथळा होणार नाही, त्याचप्रमाणे विकास आराखडा / विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन होणार नाही, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची पुष्टी करुन अशा अनाधिकृत धार्मिक स्थळांचे स्थलांतराविषयी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा व राज्यस्तरीय समितीकडे याविषयी एकत्रित अहवाल पाठवावा.

०४. वरीलप्रमाणे कालबध्द कार्यवाही करतांना प्रकरणपरत्वे समर्थनीय कारणास्तव मुदतवाढ देण्याचे तसेच जिल्हास्तरीय /महानगरपालिका स्तरीय समितीने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचे पुनरीक्षण करुन त्यात सुधारणा /बदल करण्याचे अधिकार राज्यस्तरीय समिती व शासनाकडे राहतील.

सदरहू शासन निर्णय राज्य शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०५०६१०५५४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु. ग. सोनवणे )
उप सचिव, गृह विभाग.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राज भवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग.
अपर मुख्य सचिव, महसूल विभाग.
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,
प्रधान सचिव (अ.व सु.) यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग.
प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग.
मा.मुख्य सचिवांचे सचिव.
सर्व महानगरपालिका आयुक्त.
व्यवस्थापकीय संचालक, एम.आय.डी.सी./सिडको/ एस.टी. महामंडळ/म्हाडा
महाव्यवस्थापक (पश्चिम/मध्य) रेल्वे
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व पोलिस आयुक्त.
सर्व पोलिस अधिक्षक.
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा
मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
मा. राज्य मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती (विशा-१ ब).

----------